
नंदीच्या पाठीवर कुबड



नंदीच्या पाठीवर कुबड

दामोदर धर्मानंद कोसांबी
अनुवाद : नीलांबरी जोशी

सकाळ प्रकाशन

नंदीच्या
पाठीवर
कुबड




दामोदर धर्मानंद कोसांबी
अनुवाद : नीलांबरी जोशी

निर्मिती : संतोष शेणई
आतील रेखाटने : करेन हेडॉक
मुखपृष्ठ व मांडणी : प्रशांत काळे

प्रथमावृत्ती : १५ डिसेंबर २००८,
किंमत : ५० रुपये.

सकाळ प्रकाशन, ५९५, बुधवार पेठ, पुणे

मुद्रक : विकास इलेक्ट्रिकल अॅण्ड सिरॅमिक
प्रॉडक्ट प्रा. लि. प्लॉट नं. ३२, एम. आय. डी.
सी. सातपूर, नाशिक.



दामोदर धर्मानंद कोसांबी यांनी लहान मुलांसाठी लिहिलेली ही एकमेव कथा. प्रोफेसर कोसांबींनी ही कथा त्यांचे सहकारी दिव्यभानुसिंह चावला यांना लंडनला १९६६ मध्ये त्यांचे अकाली निधन होण्याच्या काही काळ आधी पाठविली होती. संस्कृती आणि निसर्ग यांचे नाते या कथेतून मुलांपर्यंत नकळत पोचविले जाते.

नंदीच्या
पाठीवर
कुबड

तो गावातल्या गुरांच्या वार्षिक जत्रेचा दिवस आहे. संध्याकाळच्या गुरांच्या मिरवणुकीच्या आधी, गावातल्या सरपंचांचा मुलगा राम आपल्या बैलाला - नंदीला - चरायला घेऊन गेला आहे. जंगलात एक तळे आहे. त्या तळ्यापाशी एका पिंपळाच्या झाडाजवळ रामचे सवंगडी एक एक करत जमा झाले. ते सर्व जण मिळून एका प्रश्नाचे उत्तर शोधायचा प्रयत्न करत आहेत.

नंदीच्या
पाठीवर
कुबड

भारतीय बैलांच्या पाठीवर कुबड का असते?

रामाने विचारले, "सांगा बरे बैलांच्याच पाठीवर कुबड का असते? जरा म्हशीकडे बघ... त्या घोड्याकडे बघ... त्यांची पाठ तर एकदम सरळ आहे."


तेवढ्यात रामचा कुत्रा धावत पळत आला. मोती म्हणाला, "भो भो... माहिती आहे का? जेव्हा मी



मांजराला पकडायला जातो तेव्हा ते पाठ कमानीसारखी उचलते. नंदीसुद्धा पाठ अशीच उचलत असेल. त्याला कोणी तरी घाबरवत असेल.'' एवढे बोलून मोती नंदीच्या मागून पाणी प्यायला निघून गेला. नंदी गालातल्या गालात हसत होता.

डरांव डरांव... बेडूक पाण्यात उडी मारताना ओरडला, ''आमच्या बहाद्दर नंदीला घाबरविणे फार






अवघड काम आहे. काही दिवसांपूर्वी एका वाघाने खूप प्रयत्न केले; पण नंदी काही पळाला नाही. आता माझ्याकडे बघा... मी फुगून कसा फुग्यासारखा होतो. मला वाटते, की नंदीनेही माझ्यासारखीच स्वतःच्या पाठीत हवा भरली असेल." हे ऐकून पिंपळाच्या बुंध्यातील बिळातून साप बाहेर आला.

फिस्स फिस्स... असे फुस्कारत तो म्हणाला, "हवेने





फक्त छाती भरता येते, पाठ नाही काही. मी एकदा एक उंदीर आख्खा खाल्ला आणि आठवडाभर सुस्त पडून राहिलो होतो. तेव्हा मी पण फुगलो होतो. नंदीने पण काहीतरी मोठे खाल्ले असेल.''

हा हा हा... असे ओरडत एक अस्वल जंगलाबाहेर आले. ''नंदी नेहमी छोट्या छोट्या गोष्टीच खातो बरं का! तुम्हाला काय वाटते, त्याने एक मोठ्ठा भोपळा आख्खा खाल्ला आहे? मागच्या वर्षी मी मधमाश्यांच्या

पोळ्यातून मध खायला गेलो तेव्हा त्या मला खूप चावल्या. त्याने माझा चेहरा एका बाजूने पूर्ण सुजला होता. मला वाटते, की आपल्या नंदीलाही कोणीतरी खूप चावले असेल.''

या दरम्यान माकडसुद्धा पिंपळाच्या झाडावरून उड्या मारत खाली आले. खो खो हसत ते म्हणाले, ''बघा, या झाडाची फळे खाऊन माझे गाल कसे फुगतात. नंदी गवत खातो. तेव्हा त्याने आपल्या पाठीत



गवत लपविले असणार. लपविलेले गवत नंतर तो थोडे थोडे खात असेल. बघा आताही तो चरतोय."

"तू शेवटी एका हावरट माकडासारखाच बोललास. हे बघ, नंदीच्या पाठीवरचे कुबड नेहमी एकसारखेच असते. फळ खाऊन झाल्यावर तुझे गाल एकदम फुसुक होतात; पण नंदीच्या पाठीवरचे कुबड एकसारखेच दिसते," राम म्हणाला.

नंदी म्हणाला, "मला वाटत होते, की सर्व बैलांना



जशी शिंगे असतात; तसेच सर्व बैलांना कुबड असते. काल मला जिल्हा पातळीवरच्या प्रदर्शनात प्रथम पारितोषिक मिळाले. तेथे युरोपमधून आलेले काही बैल होते. मला त्यांच्याकडे पाहून जरा आश्चर्यच वाटले. त्यांना शिंगे नव्हती व त्यांची पाठ एकदम चपटी, सपाट होती. युरोपमधले बैल एकमेकांना कुजबुजत्या आवाजात सांगत होते. जरा या कुबड्या बैलाकडे पाहा. त्याला प्रथम पारितोषिक मिळाले आहे. मला

नंदीच्या
पाठीवर
कुबड

यात माणसांचेच कारस्थान दिसत आहे. पाठीवरच्या कुबडामुळे बैलाला नांगराला जोडायला सोपे जाते. कुबडामुळेच मी नांगर व बैलगाडी नीट ओढू शकतो. युरोपमधील बैलांनी मला सांगितले, की त्यांच्याकडे नांगरणीसाठी आधी घोड्यांचा उपयोग होत होता. आता शेतात यंत्राद्वारे नांगरणी होते.'' राम याच्याशी सहमत झाला नाही. तो म्हणाला, ''या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे शंकराचे वाहन नंदी आहे. शंकराने नंदीच्या पाठीवर कुबड यासाठी बनविले, की तो त्याच्यावर जरा टेकून




आराम करू शकेल. हे बघा... या चित्रात शंकर किती आरामात नंदीच्या पाठीवरून चालले आहेत. आपल्या गावात हे पिंपळाचे झाडच आपले कुलदैवत आहे. त्यालाच नंदीच्या कुबडाचे कारण विचारू चला."

म्हाताऱ्या पिंपळाच्या झाडाने उत्तर दिले, "नंदीने बरोबर सांगितले. माणसाने स्वतःसाठी या बैलांना माणसाळवले. माणसानेच मोत्यासारखे कुत्रे पाळले आहेत. माणसांनीच धान्य आणि गहू पिकविले आहेत. याचबरोबर मनुष्याने स्वतःलाही घडविले आहे."

राम : हे कसे शक्य आहे? आम्ही मागच्या वर्षी नवीन घर बांधले. अनेक माणसांनी मिळून ते बांधले. त्यासाठी आधी झाडे कापली. मग ओंडके मोजून घेतले. यासाठी अनेक लोकांना मेहनत करावी लागते. त्यानंतर पूर्ण फ्रेम खिळे ठोकून जोडून घेतली. कौले शाकारायला मी माझ्या वडिलांना मदत केली; पण आम्ही नंदीला कसे बनविणार? तो तर एक वासरू म्हणून जन्माला आला आणि तेव्हापासूनच त्याच्या पाठीवर कुबड आहे. दोन वर्षांपूर्वी मोती हे एक छोटेसे





कुत्र्याचे पिल्लू होते. मी इतकेच केले, की आईने माझ्या ताटात वाढलेले अन्न मी तिची नजर चुकवून थोडेसे त्याला खायला घातले. आम्ही काही मोतीला वाढवून मोठा कुत्रा बनविले नाही. धान्य पिकविण्यासाठी आम्ही शेतात फक्त बी पेरले. चार महिन्यांत आम्हाला त्याच प्रकारचे खूप सारे धान्य मिळाले. आम्ही तर ते धान्य बनविले नाही.

पिंपळाचे झाड : राम, तू एक हुशार मुलगा आहेस. शिकण्याची हीच पद्धत आहे. सारखे प्रश्न


विचारत राहायचे. जोपर्यंत तुम्हाला सत्याचे आकलन होत नाही तोपर्यंत प्रश्न विचारा. आता लक्ष देऊन ऐक. मी तुला जे सांगणार आहे ते मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे. हजारो वर्षांपूर्वी आज ज्या प्रकारे माकडे राहतात, तसाच मनुष्य राहत होता. माणसे जेवणासाठी फळे तोडायला झाडावर चढत असत. ती कंदमुळे खात असत. माणसे अस्वलाप्रमाणेच मध गोळा करत असत. ती कधी कधी अस्वलाप्रमाणेच पंजाने मासे पकडत. इतर प्राण्यांची शिकार करून मांस खात. तेव्हा ना आग

नंदीच्या
पाठीवर
कुबड

होती, ना नांगर... ना घरे ना झोपड्या. लोक इकडून तिकडून अन्न गोळा करून स्वतःची उपजीविका करत होते. आता लोक स्वतः धान्य पिकवितात.

राम : पण जर आमचे पूर्वज या प्रकारे जगू शकत होते, तर त्यांनी धान्य का पिकविले? माझे वडील व माझा मोठा भाऊ शेतात किती कष्ट करतात. आम्ही इतक्या कष्टांशिवाय जगू शकत नाही का?

पिंपळाचे झाड : दर वेळेला गरजेइतके अन्न गोळा करणे शक्य होत नव्हते. कधी कधी दुष्काळ पडतो. नद्या-नाले सुकून जातात. मासे मरून जातात.



जंगली जनावरे दूर निघून जातात. फळेही नसतात. त्यात, तुम्ही वर्षभर धान्य साठवून ठेवू शकत नाही. यासाठी माणसाला धान्य साठवून ठेवण्याची गरज भासू लागली. पावसाळ्यानंतर येणारे पीक चांगले असते. तुम्ही वर्षभर ते धान्य साठवून खाऊ शकता. जास्त धान्य पिकवले, तर जास्त लोक त्यावर जगू शकतील. आता माझ्या सर्वांत वरच्या फांदीवरून पंचक्रोशीतील पाच गावे दिसतात. पूर्वीच्या काळी याच ठिकाणी पाच माणसेसुद्धा दिसत नव्हती.

राम : ठीक आहे; पण माणसांनी मोत्यासारखे कुत्रे



का बरे बनविले?

पिंपळाचे झाड : पूर्वी शिकार करताना माणसांबरोबर लांडगेही जंगली जनावरांचा पाठलाग करत. त्यातली काही पिल्ले माणसांनी पाळली. त्यातली बरीचशी मोठी झाल्यावर जंगलात पळून गेली; पण काही माणसांसोबतच राहिली. ती मोठी झाल्यावर माणसांसाठी शिकारीचा पाठलाग करू लागली. त्या बदल्यात माणसांनी त्यांना मांस व हाडे खायला देण्यास सुरवात केली. या प्रकारे जंगली लांडगे पाळीव झाले. त्यांना आता आपण कुत्रे म्हणतो.

नंदीच्या पाठीवर कुबड


राम : मला आनंद वाटतो, की लोकांनी हे सर्व केले. मोती नसता तर मी काय केले असते? पण नंदीच्या पाठीवर कुबड कसे काय आले? कदाचित ते सुरवातीपासूनच असे असेल. मला अजूनही या प्रश्नाचे उत्तर सापडलेले नाही.

पिंपळाचे झाड : माणसाला जंगली हरणांचा पाठलाग करणे कठीण जात होते. गाय, बैलसुद्धा त्या काळी जंगली जनावरेच होती; पण ते कमी वेगाने चालत. माणसे शिकारीसाठी त्यांचा पाठलाग करत. काही काळाने त्यांनी मोतीप्रमाणेच गाईच्या वासरांना



नंदीच्या पाठीवर कुबड

पाळायला सुरवात केली. यासाठी त्यांनी तगड्या वासरांची निवड केली. त्यांतील काही जणांच्या पाठीवर छोटे कुबड होते. कुबडामुळे लोकांना जास्त मांस मिळत होते. यासाठी ते कायम कुबड असलेल्या बैलांची निवड करत व त्यांना भरपेट खायला देत. यामुळे हळूहळू कुबड मोठे व्हायला लागले. मनुष्याला कुबड असलेल्या गायी-बैलांना पाळणे सोपे झाले. गायी दूध देत असत. हळूहळू लोक गाई व बैल यांची शिकार करण्याऐवजी त्यांना पाळायला लागले. अशा रीतीने नंदीसारखे मोठ्या कुबडाचे बैल विकसित झाले. बैलांच्या या कुबडांना वशिंड म्हणतात.



राम : ही तर हुशारीची गोष्ट झाली; पण धान्य कसे बनले?

पिंपळाचे झाड : कित्येक वर्षांपूर्वी मी लोकांना भूक भागविण्यासाठी पाने, गवताच्या बिया खाताना पाहिले होते. हळूहळू त्यांनी मोठ्या बिया वेगळ्या करायला सुरवात केली.

लोकांच्या लक्षात आले, की सगळ्या प्रकारचे गवत, पीक एकसारखे नसते. त्यांच्या असेही लक्षात आले, की चांगले पीक मृदू मातीतच उगवते व अशी



नंदीच्या
पाठीवर
कुबड

माती सगळीकडे नसते; तसेच कंद जर खोदून जमिनीत लावला, तर पुढच्या वर्षी तेथे नवीन चांगले पीक उगविते. यासाठी लोकांनी मोठ्या बिया पेरण्यासाठी जमिनीत खड्डे खणणे सुरू केले. लोक पुढच्या पिकासाठी नेहमी मोठ्या बिया पेरत.

राम : पण आम्ही धान्याच्या बिया तर अशा प्रकारे पेरत नाही, नांगराने पेरणी करतो. लोक नांगराचा उपयोग करायला कसा शिकले?

पिंपळाचे झाड : हे शिकायला त्यांना फार वेळ लागला. प्रथम त्यांनी काठीने जमीन उकरली; पण

त्याने फार फायदे झाली नाहीत; तसेच कच्चे धान्य खायला काही चांगले लागत नाही. यासाठी मानवाने आधी आगीची माहिती करून घेतली. सुरवातीला त्यांना जंगलातील भीषण आगीची भीती वाटत होती. ते आग आणि जंगली जनावरांना घाबरून पळत असत. मग त्यांनी अन्न शिजवायला सुरवात केली. आगीच्या धगीवर त्यांनी मातीची भांडी भाजायला शिकून घेतले. जमीन नीट नांगरण्यासाठी त्यांना ताकदीने ओढणारी काहीतरी वस्तू हवी होती. तेव्हा त्यांनी नांगराचा तिरका





फाळ ओढायला बैलाचा वापर करायला सुरवात केली. नांगर ओढायला त्यांना मोठ्या जनावरांची गरज होती. यासाठी त्यांनी जनावरे मांसासाठी मारणे बंद केले. यामुळे त्यांना नंदीसारखे ताकदवान बैल मिळाले.

राम : माझ्या नंदीला मारण्याची कल्पना सुद्धा मला किती मूर्खपणाची वाटते; पण तुम्ही मनुष्याने मनुष्याचीच निर्मिती केल्याचा उल्लेख केला होता.

पिंपळाचे झाड : मी आताच तुला सांगितले, की मनुष्य आगीला घाबरेनासा झाला. सुरवातीला लोक अग्नीला देवता मानून त्याची पूजा करत. हळूहळू

नंदीच्या पाठीवर कुबड

माणसे आग निर्माण करायला शिकली. यासाठी त्यांनी वाळलेली लाकडे एकमेकांवर घासली. नंतर त्यांनी माझी व नंदीची सुद्धा पूजा करायला सुरवात केली. आम्ही मनुष्याला अन्नाचा पुरवठा केला. अजूनही माझी फळे खाण्याजोगी आहेत; पण आता माणसाला माझ्या छोट्या भावाची-अंजिराची फळे जास्त स्वादिष्ट वाटतात. अंजीर आकाराने मोठे व गोड असते. तसे अंजिराचे झाड छोटे व कमजोर असते. त्याला चांगल्या मातीची गरज असते आणि भरपूर पाण्याचीही.

जंगलतोड झाली. मी भाग्यवान म्हणून वाचलो.

नंदीच्या
पाठीवर
कुबड

अनेक वेळा जंगलाला आग लागली आणि माझे भाईबंद जळाले. मी किती तरी वेळा सहीसलामतपणे त्यातून वाचलो. लोक आज देखील अग्नी, नंदी व माझी पूजा करतात; पण आजकाल ही पूजाअर्चा कमी झाली आहे. आम्ही मनुष्याची निर्मिती केलेली नाही. मी परत एकदा हे तुला स्पष्टपणे सांगतो.

राम : मग कोणी मनुष्याची निर्मिती केली?

पिंपळाचे झाड : आताच्या माणसाने स्वतःच स्वतःला घडवले आहे. सुरवातीला माणूस माकडासारखा कळपाने मैत्री करून राहणारा एक जीव

नंदीच्या
पाठीवर
कुबड

होता; पण तो असहाय होता. अग्नीनंतर मानवाने धातूंचा शोध लावला. पहिल्यांदा तांबे, मग लोखंड. त्याआधी मनुष्याने दगडांची शस्त्रे बनविली. लोकांनी शिकारीसाठी धनुष्य-बाण तयार केले. अन्न साठविण्यासाठी टोपल्या व चामड्याच्या पिशव्या बनविल्या. मासेमारीसाठी जाळे बनविले. यातून माणसांना जास्त अन्न मिळू लागले. यासाठी ते ताठ उभे राहून चालायला लागले. लोकांनी झोपड्या व घरे बनवली. ते कपडे घालायला लागले. पूर्वीच्या काळी माझ्या सावलीत मोठी माणसे सुद्धा नग्नावस्थेत राहत होती. जसे तुम्ही तुमच्या



नंदीच्या
पाठीवर
कुबड

बालपणात उघडेवाघडे माझ्या सावलीत खेळता.

राम : उन्हाळ्यात मला कपडे घालणे नकोसेच वाटते; पण आईला मी तसाच उघडा फिरलेला आवडत नाही. आता तुम्ही मला अजून एक सांगा... हे देव कुठून आले?

पिंपळाचे झाड : प्रथम लोकांना रोप उगवून येते हे कळले. त्यांनी उगविणाऱ्या रोपांना आपल्या सोयीसाठी एकत्र केले. मग लोकांना वाटले, की सर्व गोष्टींना एकच मोठी आई जन्म देते. आम्ही आजही म्हणतो, की पृथ्वी आपली माता आहे. मग मानव

जमविलेल्या गोष्टींमधूनच काही नवीन गोष्टी बनवायला शिकला. तेव्हा त्याने विचार केला. मला पण कोणीतरी बनविले असेल. तेव्हा माणसाच्या मनात परमेश्वर या संकल्पनेचा उदय झाला. लोक म्हणू लागले, 'सगळ्या गोष्टी परमेश्वरानेच बनविल्या आहेत.'

पण, मला खरे काय ते माहिती आहे. मी मनुष्याच्या सगळ्या देवांपेक्षा मोठा आहे. मी मनुष्याला स्वतःच स्वतःला घडवताना पाहिले आहे. त्याला अजून बरीच वाट चालून जायची आहे. तो इतरांशी कधी कधी फार क्रूरपणे वागतो.



आता संध्याकाळ व्हायला लागली होती. रामची आई एका टोपलीत लाल रंगाची फुले घेऊन आली. तिने तलावाशेजारी टोपली ठेवली. मग तिने पिंपळाच्या वयोवृद्ध झाडाला नमस्कार केला. रामचे मित्र तिथून पळून गेले. आई म्हणाली, "राम, इकडे ये. लवकर तयार हो. आज रात्री आपल्या नंदीला मिरवणुकीत सर्वांत पुढे उभे राहायचे आहे. आपल्याकडच्या सर्व गायी-बैलांत नंदी प्रथम जन्माला आला. नंदीला घरी नेऊन त्याला सजवू."


सकाळ प्रकाशन